**-:प्रेसनोट:-**

# मुद्रांक पेपर विक्रेता श्री. मनिष अरूण देशमुख यांचेविरूध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूरची कारवाई

जलनगर वार्ड चंद्रपूर येथील मुद्रांक (स्टॅम्प) पेपर विक्रेता यांनी २०००/- रूपयाच्या मुद्रांक (स्टॅम्प) पेपर्सवर लाच रक्कम मागणी करून स्विकारल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज दि. ३१/१०/२०२५ रोजी कार्यवाही केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे चंद्रपूर येथील रहिवासी असून त्यांना विज टेंडर कामाकरीता ५०० /- रूपयाचे ०३ मुद्रांक पेपर्स व १००/- रूपयाचे ०५ मुद्रांक पेपर्स असे एकुण २०००/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सची आवश्यकता असल्याने प्रत्येक ५०० रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर ३०/- रू. असे ३ पेपर्सचे ९०/- रूपये व प्रत्येक १००/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर १०/- रूपये असे ५ पेपर्सचे ५०/- रूपये असे एकुण २०००/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर २०००/- रू. शासकीय शुल्कासह अतिरीक्त १४०/- रूपये लाच दिल्याशिवाय मुद्रांक पेपर्स देणार नसल्याची तक्रारदार यांना खात्री होती. परंतु तक्रारदार यांना आरोपी श्री मनिष अरूण देशमुख, मुद्रांक विक्रेता रा. चंद्रपूर हयांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरून आज दि. ३१/१०/२०२५ रोजी आरोपी क्र. १ श्री. मनिष अरूण देशमुख, मुद्रांक पेपर विक्रेता, रा. जलनगर वार्ड, चंद्रपूर व आरोपी क्र. २ मदतनीस कु. रूपाली भरतलाल चौधरी यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी प्रत्येक ५०० रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर ३०/- रू. असे ३ पेपर्सचे ९०/- रूपये व प्रत्येक १००/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर १०/- रूपये असे ५ पेपर्सचे ५०/- रूपये असे एकुण २०००/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर २०००/- रूपये शासकीय शुल्कासह अतिरीक्त १४० /- रूपये लाच रक्कम असे एकुण २१४०/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावरून आज दि. ३१/१०/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. १) मुद्रांक पेपर विक्रेता श्री. मनिष अरूण देशमुख यांनी ५०० /- रूपयाचे ०३ मुद्रांक पेपर्स व १००/- रूपयाचे ०५ मुद्रांक पेपर्स असे एकुण २०००/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर २०००/- रूपये शासकीय शुल्कासह अतिरीक्त १४०/- रूपये लाच रक्कम असे एकुण २१४०/- रूपये स्विकारून त्यांचे मदतनीस कु. रूपाली भरतलाल चौधरी हिचेकडे दिल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. आरोपी क्र. १) मुद्रांक पेपर विक्रेता श्री. मनिष अरूण देशमुख यांनी शासनाने घालुन दिलेल्या नियमाचा व अधिकाराचा अप्रामाणीकपणे वापर करून एकुण २०००/- रूपयाचे मुद्रांक पेपर (स्टॅम्प) शासनाने नेमुन दिलेल्या किंमतीपेक्षा अधिकचे १४०/- रूपयाची लाच मागणी करून स्विकारले आहे. तरी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपासकार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निलेश उरकुडे यांनी व सापळा पथक पोशि अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, राजेंद्र चौधरी, म.पो.शि. पुष्पा काचोळे, चापोशि/सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीतअसल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी क्रमांक** :- ०७१२-२५६१५२०
  डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक** :- ०७१७२-२५०२५१
  टोल फ्रि क्रमांक :- १०६४
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९३२२२५३३७२
  श्री. निलेश उरकुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ८४५९८४८५५६
  श्री. सचिन धर्मेजवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९६२३०५५६५५

**Email: acbchandrapur@gmail.com Website: www.acbmaharashtra.gov.in**

( निलेश उरकुडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर